**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक २४/०२/२०२५ (सोमवार) संध्याकाळ**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ५ गुन्हे नोंद. कन्हान पोलीसांची कारवाई, १ कोटी ६३ लाख ७५ हजार रूपयांचा मुददेमाल जप्त

दिनांक २२/०२/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की नागपुर जबलपुर हायवे ने अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. त्या अनुषंगाने पोलीसांनी नागपुर जबलपुर हायवे तारसा चौक, कन्हान येथे नाकाबंदी करून त्यांनी खालील प्रमाणे कारवाई करून ५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**१.** नाकाबंदी दरम्यान २२/०० वाजता मन्सरकडुन कन्हान च्या दिशेने येणा—या संशयीत टिप्पर क्र. क्रमांक एम.एच. ४९ बी.झेड. ४८७३ ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता, सदर वाहनात मध्ये १० ब्रास रेती मिळून आली. वाहन चालक १.**शहानजान सिराज अहमद जाफर वय ३१ वर्षे रा. शेख बुनकर कॉलनी ,कामठी जि नागपुर,यालापरवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे कोणताही परवाना नव्हता. तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता त्याचे मालकाचे नाव पंचम गिरीधर भगत, रा. ठवरे कॉलनी ,जरीपटका,नागपुर असे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली** . पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये आणि २) क्र. क्रमांक एम.एच.४९ बी.झेड. ४८७३ किंमती ३५,००,०००/— रूपये असा एकुण **३५,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**२.** नाकाबंदी दरम्यान २२/१० वाजता मन्सरकडुन कन्हान च्या दिशेने येणा—या संशयीत टिप्पर क्रमांक एम.एच ४० सी.टी.१७०० ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता, सदर वाहनात मध्ये ०६ ब्रास रेती मिळून आली. **वाहन चालक पुरूषोत्तम विष्णु उईके वय ३७ वर्ष रा. झींझरीया ता. रामटेक जि.नागपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे कोणताही परवाना नव्हता. तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता सदर वाहन**

**त्याच्याच मालीकीचे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली .** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/– रूपये आणि २) टिप्पर क्रमांक एम.एच ४० सी.टी. १७०० किंमती ३५,००,०००/– रूपये असा एकुण **३५,३०,०००/–रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**३.** नाकाबंदी दरम्यान २२/२० वाजता मन्सरकडुन कन्हान च्या दिशेने येणा–या संशयीत टिप्पर एम.एच ४० सी.एम. २५२६ ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता, सदर वाहनात मध्ये ०७ ब्रास रेती मिळून आली._**वाहन चालक हमीद अब्दुल बेग वय ४० वर्ष रा. शिवाजी नगर पिपरी ,कन्हान ता. पारशिवनी जि.नागपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे कोणताही परवाना नव्हता. तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता सदर वाहन त्याच्याच मालीकीचे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली .** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ०७ ब्रास रेती किंमती ३५,०००/– रूपये आणि २) टिप्पर एम.एच ४० सी.एम. २५२६ किंमती ३०,००,०००/– रूपये असा एकुण **३०,३५,०००/–रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**४.** नाकाबंदी दरम्यान २२/२५ वाजता मन्सरकडुन कन्हान च्या दिशेने येणा–या संशयीत टिप्पर क्रमांक एम.एच.४९ ए.टी १८१७ ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता, सदर वाहनात मध्ये ०४ ब्रास रेती मिळून आली._वाहन _**चालक .डिलेश आसारामजी गौतम, वय ३२ वर्ष रा.वाराशिवनी बोटेझरी ,बालाघाट,मध्यप्रदेश याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे कोणताही परवाना नव्हता. तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता त्याचे नाव रविन्द्र पित्तमसिंह पटले रा. वाराशिवनी बोटेझरी ,बालाघाट,मध्यप्रदेश असे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली .** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ०४ ब्रास रेती किंमती २०,०००/– रूपये आणि २) टिप्पर क्रमांक एम.एच.४९ ए.टी १८१७ किंमती ३०,००,०००/– रूपये असा एकुण **३०,२०,०००/–रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**५.** नाकाबंदी दरम्यान २२/३० वाजता मन्सरकडुन कन्हान च्या दिशेने येणा–या संशयीत टिप्पर क्रमांक एम.एच ४९ सी.एम. ९८०८ ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता, सदर वाहनात मध्ये ०८ ब्रास रेती मिळून आली. वाहन **चालक मोहीत मुसाफीर यादव वय २६ वर्ष रा.शिवनगर शहीद चौक कन्हान ता. पारशिवनी जि.नागपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे कोणताही परवाना नव्हता. तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली**

**असता सदर वाहन त्याच्याच मालीकीचे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली** . पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये आणि २) टिप्पर क्रमांक एम.एच ४९ सी.एम. ९८०८ किंमती ३२,००,०००/— रूपये असा एकुण **३२,४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर करवाई मध्ये एकुण १ कोटी ६३ लाख ७५ हजाररूपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

**वर नमुद ७ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे** कलम ३०३ (२),भा.न्या.सा. ४८(७),४८(८),म.ज.म.स,१९६६,कलम ४,२१ खाण आणि खनिज अधि.१९५७ ,कलम ३ सार्वजनिक सं.नु.प्रति अधि. १९८४ अन्वये ५ गुन्हे नोंद केले आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर